तार: "ज्ञानतीर्थ"
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी,
नांदेड – ४३१ ६०६.

Gram : "Dnyanteerth"
Swami Ramanand Teerth
Marathwada University,
Vishnupuri,
Nanded - 431 606.

विद्यापीठ मान्यताप्राप्त लेखनसाहित्य प्रकाशन व स्वामित्व शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून लागू करण्याबाबत.

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, **दिनांक ३० एप्रिल २०१४ रोजी संपन्न झालेल्या ३२व्या मा. विद्या परिषद बैठकीतील विषय क्र.४९/३२–२०१४** च्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठ मान्यताप्राप्त लेखनसाहित्य प्रकाशन व स्वामित्व शुल्काबाबतच्या 'परिपत्रक क्र.शैक्षणिक–०१/परिपत्रक/ विद्यापीठ मान्यताप्राप्त लेखनसाहित्य प्रकाशन व स्वामित्व शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना/२०१३–१४/ २५४५, दिनांक ०६.१२.२०१३' मधील काही मार्गदर्शक सूचना दुरुस्त करण्यात आलेल्या असून, नवीन मार्गदर्शक सूचना सोबत जोडण्यात आल्या आहेत. ह्या मार्गदर्शक सूचना शैक्षणिक वर्ष २०१३–२०१४ पासून लागू करण्यात येत आहेत.

सदरील मार्गदर्शक सूचना प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–०१/परिपत्रक/विद्यापीठ मान्यताप्राप्त लेखनसाहित्य प्रकाशन व स्वामित्व शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना/ २०१४–१५/५६५
**दिनांक** : २३.०७.२०१४.

स्वाक्षरित/–
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. परीक्षा नियंत्रक यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग व पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) सिस्टम एक्सपर्ट, यूजीसी कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## विद्यापीठ मान्यताप्राप्त लेखनसाहित्य प्रकाशन व स्वामित्व शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना

१. अभ्यासक्रमाप्रमाणे पाठ्यपुस्तक/ग्रंथ/संदर्भग्रंथ/वाचनसाहित्य इत्यादींचे लेखन/संकलन/संपादन करण्याची जबाबदारी संबंधित विद्याशाखेचे मा. अधिष्ठाता व संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळावर राहील. महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ कलम ३८ (क) व ३४ (फ) मध्ये नमूद केलेल्या सर्व लिखित बाबींचा यात समावेश आहे.

२. लेखन/संकलन/संपादन केलेल्या साहित्यासाठी योग्य प्रकाशक ठरविण्याचे संयुक्त अधिकार मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ आणि संबंधित अभ्यासमंडळाचे असतील. त्याचबरोबर स्वामित्व हक्क, मुद्रणदोष यासंबंधीची तसेच योग्य, अचूक व समाजहिताच्या माहितीचाच अंतर्भाव ग्रंथात करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संपादक मंडळ व सल्लागार मंडळावर राहील.

३. प्रकाशकास विद्यापीठासोबत करार (Memorandum of Understanding) करावा लागेल. विद्यापीठाच्यावतीने करारावर स्वाक्षरीचे अधिकार मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ, यांच्याकडे असतील. विद्यापीठाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे पालन करणे प्रकाशकावर बंधनकारक राहील.

४. प्रकाशित ग्रंथाचे स्वामित्व हक्क (Copy Right) मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांच्याकडे असतील. तसे प्रत्येक ग्रंथात नमूद करणे बंधनकारक असेल. (केवळ पदनाम असेल, वैयक्तिक नामाचा उल्लेख असणार नाही.)

५. पाठ्यपुस्तकाची किंमत वाजवी, रास्त, सामान्य विद्यार्थ्यांच्या आवाक्यातील असावी.

६. प्रकाशकास पुस्तक/ग्रंथ प्रकाशनपूर्व अग्रीम स्वामित्व शुल्क रक्कम रुपये १०,०००/— (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) विद्यापीठाकडे जमा करावी लागेल. ही रक्कम एकूण स्वामित्व शुल्कात वळती करून घेण्यात येईल. उर्वरित स्वामित्व शुल्क ग्रंथाची छापील किंमत व एकूण प्रती प्रमाणे १५ टक्के दराने प्रतिवर्षी एप्रिल महिन्यात प्रकाशकाने विद्यापीठाकडे जमा करावे. सदर ग्रंथातील मजकूर/पाठ्यलेखनापोटी विद्यापीठास प्राप्त स्वामित्व शुल्काच्या रकमेतून ३३ टक्के रक्कम संबंधित लेखकास मानधन म्हणून समप्रमाणात देण्यात यावी.

७. पाठ्यपुस्तकाच्या ग्रंथनामपृष्ठावर (Title Page) 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांच्या अभ्यासक्रमास अनुसरून व अभ्यासमंडळाच्या मान्यतेने' असा सुस्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

८. ग्रंथास International Standard Book Number (ISBN) बंधनकारक असेल.

९. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी ग्रंथाच्या आवश्यक प्रती प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक पुरवठा व वितरण व्यवस्था विहीत मुदतीत करण्याची जबाबदारी प्रकाशकाची असेल.

१०. या प्रकाशित साहित्यावर विद्यापीठाचे बोधचिन्ह वापरता येणार नाही.

११. संपादक मंडळ व सल्लागार मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील.

संपादक मंडळ –

| | |
|---|---|
| संबंधित अभ्यासमंडळाचा अध्यक्ष | – मुख्य संपादक |
| अभ्यासमंडळाने नामनिर्देशित केलेले २ सदस्य | – सदस्य |
| संबंधित अधिष्ठातांकडून नामनिर्देशित एक विषयतज्ज्ञ | – सदस्य |

सल्लागार मंडळ –

| | |
|---|---|
| संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता | – अध्यक्ष |
| मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले दोन सदस्य | – सदस्य |

१२. ग्रंथाचे मुद्रण, बांधणी, कागद, रंगसंगती उत्तम व उत्कृष्ट दर्जाचीच असावी. ग्रंथाची निर्मिती सर्वांगसुंदर व्हावी.

१३. पुस्तक/संदर्भग्रंथ/प्रकाशित साहित्याच्या २५ प्रती प्रकाशकाने विद्यापीठास विनामूल्य द्याव्यात. प्राप्त २५ प्रतींपैकी ५ प्रती विद्यापीठ ग्रंथालयास व उर्वरित २० प्रती शैक्षणिक विभागाकडे सोपविल्या जातील. त्यातून मा. अधिष्ठाता, संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष/सदस्य व संपादक मंडळाचे सदस्य यांना प्रत्येकी एक प्रत भेटस्वरूप दिली जाईल. याव्यतिरिक्त पुस्तकात ज्या लेखकांचे लेख अथवा काही भाग समाविष्ट केला असल्यास, त्यांना तसे पत्र विद्यापीठातर्फे देऊन त्यांचे आभार मानण्यासाठी तसेच पुस्तकाची एक प्रत त्यांना भेट देण्यासाठीही जेवढ्या लेखकांची नावे त्या पुस्तकात असतील, तेवढी अधिकची पुस्तके (उपरोक्त २५ प्रतींव्यतिरिक्त) प्रकाशकाने विद्यापीठास विनामूल्य द्यावीत. या मान्यवरांना पुस्तकाची प्रत पाठविण्यासाठी संबंधित अभ्यासमंडळाने त्यांची नावे व पूर्ण पत्ता यांची यादी अभ्यासमंडळ विभागास सादर करावीत.

१४. परिस्थितीनुरूप मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांच्याकडे असतील.

मार्गदर्शक सूचनांबाबत सखोल चर्चा होऊन उपरोक्त सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आल्या. अशाच प्रकारच्या मार्गदर्शक सूचना विद्यापीठाच्या इतर सर्वच प्रकाशनासंबंधी कराव्यात, असे सर्वानुमते सुचविण्यात आले.

❖ ❖ ❖